मधुकर ना. गोगटे (अभियंता) 4 पवन अपार्टमेंट, लक्ष्मी पार्क, नवी पेठ, पुणे 411030
फोन (020) 24537574 (www.mngogate.com लेख m12 पहा) mngogate1932@yahoo.com

---

मराठीच्या प्रमाण भाषेचे शुद्धलेखन - एक नवविचार

वरील विषयावर एक चर्चासत्र 20, 21 फेब्रुवारी 2008 रोजी मॉडर्न कॉलेजने आयोजित केले. मराठी अभ्यास परिषद व राज्य मराठी विकास संस्था यानी त्यास अनुदान दिले. मराठी साहित्य महामंडळ यानी शुद्धलेखन सुधारणांबाबत सूचना मागवल्या असल्याने सर्व चर्चा उपयुक्त झाली. या चर्चासत्रात काही निबंध सादर झाले. अखेरीस थोडा वेळ श्रोत्यांना दिला तेव्हा मी पुढील निवेदन केले > >

वेळेअभावी फक्त 2 मुद्दे घेतो. (च ज झ) यांचे दुहेरी ध्वनी स्पष्ट करण्यास नुक्ता (अक्षराखाली ठिपका)असावा ही अनेकांची सूचना योग्य आहे. समजा, नुक्ता लिहिला नाही तरी निदान तरतूद हवी.

इ, ई, उ, ऊ यांचे ऱ्हस्वदीर्घत्व शुद्धलेखनात असावे असे काहींचे मत आहे तर काहींना हे भेद नको आहेत. गुजरातीत ऱ्हस्वदीर्घभेद काढून टाकण्याचा विचार झाला. काही लेखक व प्रकाशक यानी तो स्वीकारला. यावर भाषा आणि जीवन अंकात लेख आला त्याचा उल्लेख काही निबंधात आहे

इ-उ या स्वरांचे ऱ्हस्वदीर्घभेद नकोत, व ते देवनागरीतील दीर्घ स्वरूपात लिहावेत असे मी सुचवतो (उदा विज्ञान ऐवजी वीज्ञान). त्यामुळे लेखन तर्कशुद्ध होईल. मूर्ति शब्दात (र् त् इ) क्रमाने उच्चार होतो पण लेखनात (इ त् र्) क्रम आहे. पूर्वी मॅन्युअल टंकयंत्रात कुंजीसंख्या कमी असे. (रु) साठी एक कुंजी key लागत असे. (मु) प्रमाणे (र) खाली उकारचिन्ह मान्य केले असते तर बरे झाले असते. मग कुंजी कमी पडल्यामुळे (पाऊण य) हे चिन्ह गाळावे लागे व (नाट्य) ऐवजी (नाटय) असे अशुद्ध लेखन होत असे. यंत्राच्या काही मर्यादा असतात हे लक्षात घेतले जात नसे. (अग्नि) हा शब्द लिहिताना (काना व वेलांटी) अगोदर टाइप करावे लागे. वेलांटी नंतरच्या (ग्न) जोडाक्षराला सामावून घेत नसे. हल्ली संगणकात कित्येक जोडाक्षरे पारंपारिक पद्धतीने लिहिता येतात. परंतु भविष्यकालात काही यंत्रांना पुन्हा अडचणी येऊ शकतील. मूळातच चिन्हांची तर्कशुद्धता असावी. (ग्नी) असे लिहीणे छपाई व आकलन यांस सोयीचे आहे. (जुगार) या शब्दातील (ज) खाली नुक्ता दिला तर त्याच जागेत ऱ्हस्व उकाराचे चिन्ह लिहीणे छपाईस गैरसोयीचे होईल. कशीतरी छपाई केली तरी आकलन कठीण होईल. (जूगार)हे लेखन मान्य केल्यास (ज) खाली नुक्ता देण्यास काही मोकळी जागा मिळेल

(सही)

ही लेखी नोंद 25-2-2008 रोजी (निमंत्रक)डॉ स्नेहल तावरे, मराठी विभाग प्रमुख, मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर पुणे 411005 यांस पाठवली (अन्य काही मंडळींना माहितीसाठी प्रती). वेळेअभावी पुढील कारणे सभेत दिली नाहीत (पण काही निबंधांत आहेत). इतरही स्वर उच्चारात ऱ्हस्वदीर्घ होतात. पण इ, उ साठी ऱ्हस्वदीर्घभेद घेतल्याने व्याकरण क्लिष्ट झाले आहे. (कर) शब्दास अनेक अर्थ आहेत ते संदर्भाने आपण जाणतो. तसेच (दीन) म्हणजे (दिन की दीन ?) हे संदर्भाने समजेल. हजारो इंग्रजी शब्द मराठीत येत आहेत. मग पोलिस की पोलीस? असे पेच पडतात. सरसकट दीर्घरूप सोपे ठरेल.